**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २४/२०१७-१८/२९६ दिनांक: १२.१०.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. २४/२०१७-२०१८**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुकाराम विठ्ठल भोसले<br>मु.पायाप्पाचीवाडी डोंगरवाडी रस्ता<br>ता. मिरज जि. सांगली : | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय कवठेमहांकाळ | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग मिरज ग्रामिण-२ | |

**कोरमः-** १. श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार .

**निर्णय**

मी प्र.वि.खपली सदस्य सचिव, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**ग्राहकाची मागणी.**

१. श्री तुकाराम विठ्ठल भोसले मु.पो. पायापाचीवाडी ता. मिरज जि. सांगली यांना पोल्ट्रीफॉर्मसाठी विज जोडणी हवी आहे. त्यांचा ग्राहक क्र. २७९५८०००५७३४/५ असाआहे. त्यानी पावती क्र. ४४०९९४२ दिनांक ०८.०३.२०१६ रोजी रु. १,०६३/- महावितरणकडे जमा केले आहेत. त्यांना विज जोडणी वेळेत प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी अंतर्गत कक्ष सांगली येथे तक्रार नोदविली पण तेथील निर्णय मान्य नसल्याने त्यांनी अ फॅार्ममध्ये कोल्हापूर मंचे येथे तक्रार दाखल केली यामध्ये त्यानी तत्काळ विज कनेक्शन मिळावे आणि संबंधीत सर्व अधिकारी यांचेकडून मला झालेलेली नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

**वि. प. यांची भूमिका.**

२. वि. प.तर्फे श्री अमोल विलासरा व माने, उपकार्यकारी अभियंता मिरज ग्रामिण २ हे उपस्थित होते. त्यांनी आपल्या दि. २३.०६.२०१७ च्या पत्रात या ठिकाणी कोणतीही वाहिनी उपलब्ध नसल्यामुळे रोहित्र व वाहिनीचे काम करणेचे आवश्यक आहे. असे म्हटलेले आहे. हे काम पुर्ण झालेनंतर विज जोडणी देता येईल असे त्यांनी सांगितले सदर ग्राहकाने मिरज ग्रामिण-एक च्या जवळ सदर क्षेत्र येत आहे. ग्राहकास घरगुती विज जोडणी मिरज ग्रामिण-१ मधूनच दिलेली आहे. आणि पोल्ट्रीसाठी सिंगल फेज कनेक्शनच हवे आहे ते येथून देता येईल असे सांगितले आणि ब-याच ग्राहकाना दिलेले आहे. असे सांगितले यावर सखोल चर्चा करण्यात आली सर्व कागद पत्राचे वाचन करण्यात आले.यावर खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) ग्राहकाची विज जोडणीची मागणी मान्य करता येईल का?
उत्तरः- होय.
२) अधिकारी यांचेकडून नुकसान भरपाईची मागणी मान्य करता येईल का?
उत्तरः- नाही
३) कोणता अंतिम आदेश?
उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

**कारणमिमांसा**

३. ग्राहकाने दि. ०८.०३.२०१६ रोजी पैसे भरुन रितसर विज मागणी केली आहे. त्याला नियमाप्रमाणे त्वरीत विज जोडणी ३ महिन्यात मिळणे आवश्यक होते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग वितरण परवाना धारकांची कृतीची मानके विनियम २०१४ कलम ४.८ असे सांगतो की, जेव्हा एखाद्या जागेस वीज पुरवठा करण्यासाठी वितरण मेन्सचा विस्तार किंवा क्षमता वाढ करण्याची गरज असेल तेव्हा वितरण परवानाधारक अशा जागेला परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्याच्या तारखेपासून व आयोगाने वेळोवेळी मान्यता दिलेल्या आकारांचा भरणा करण्यात आल्यानंतर तीन (३)महिन्याच्या आत विद्युत पुरवठा सुरु करेल. वितरण मेन्सच्या विस्तार किंवा वाढीमध्ये उच्च-दाब वाहिन्यांचा विस्तार आणि वितरण रोहित्र उपकेंद्राच्या क्षमता वाढीचा समावेश असतो.

या ग्राहकाचा महसूली समावेश मिरज ग्रामिण २ मध्ये असून याला विज पुरवठा नजिकच्या मिरज ग्रामिण-१ मधून होऊ शकतो हे चर्चे दरम्यान लक्षात आले संबंधीत मिरज ग्रामिण-१ व मिरज ग्रामिण-२

यानी काही तांत्रिक बाबीचा विचार करुन या ग्राहकास त्वरीत विज पुरवठा करावा असे मंचाचे मत झाले आहे. यास्तव या ग्राहकास पोल्ट्रीसाठी अर्जाप्रमाणे त्वरीत विज जोडणी देण्यात यावी.

४) मुद्दा क्रमांक २ बाबतची मागणीचा मुद्दा ग्राहकाने चर्चे दरम्यान उपस्थित केलेला नसून अधिकारी यांचेकडून नुकसान भरपाईचा मुद्दा विचारात घेता येत नाही असे मंचास वाटते.

**आदेश**

१) ग्राहकास दि. १०.०१.२०१८ पूर्वी विज जोडणी देण्यात यावी.
२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

दिनांक ०१.०७.२०१७ पासून अध्यक्ष पद रिक्त आहे.

(श्री प्र. स. बुरांडे)
ग्राहक सदस्य

(प्र.वि. खपली)
सदस्य सचिव

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण